# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक १९ मार्च, २०२५**

## गृह विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २९**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: बी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५५, पोलीस**<br>**रूपये:- ३,१९,९५,२७,१६,०००/-**<br>**श्री. अनंत (बाळा) नर** |
| (१) | १७४ | १०० | अंधेरी पूर्व येथील शेर – ए पंजाब कॉलनीत गुरुद्वारासमोर मध्यरात्री १२.३० च्या सुमारास दिनांक ८/३/२०२५ रोजी वा त्या सुमारास रस्त्याच्या मधोमध असलेल्या महानगर गॅस पाईपलाईनच्या लिंकेजमुळे आगीचा भडका उडाल्याची घटना घडलेली असणे,महानगर गॅस पाईपलाईन लिकेज झाल्यानंतर शॉर्टसर्किट होऊन आगीचा भडका होऊन रस्त्यावर असलेला रिक्षा चालक, आणि दोन दुचाकीस्वार जखमी होणे, तर रिक्षा आणि दोन दुचाकी असे तीन वाहने जळून खाक होणे, वाहनांचे मोठया प्रमाणात झालेले नुकसान, संपूर्ण विभागात गॅस पुरवठा तात्काळ बंद करण्यात येणे, परिणामी रहिवाश्यांचे झालेली गैरसोय, तीन्ही जखमींना जोगेश्वरी येथील ट्रामा केअर सेंटमध्ये उपचारार्थ दाखल करणे,रस्त्याच्या मधोमध अनधिकृतपणे जेसीबीने खोदकाम कोणत्या व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून करण्यात आले याबाबत सखोल चौकशी होण्याची नितांत आवश्यकता, यात दोषी असणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची गरज, यात जखमींना तात्काळ आर्थिक मदत होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ५५४ | १०० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदार संघामध्ये वनराई, मेघवाडी, जोगेश्वरी एमआयडीसी आणि आरे पोलीस ठाण्याच्या हददीमध्ये संघटीत गुन्हेगारी ,चोरी, घरफोडी,उघडया जागेवर अंमली पदार्थ्याचे सेवन व विक्री अशा अनेक प्रकारचे गुन्हे घडत आहेत, पोलीस अधिकारी व कर्मचारीवर्ग, मनुष्यबळ कमी असणे, त्यामुळे गुन्हे मोठया प्रमाणात वाढत असणे, यास आळा बसण्याकरिता हा विभाग सीसीटीव्ही च्या निगराणीखाली ठेवण्याकरिता याठिकाणी सीसीटीव्ही लावण्याची नितांत आवश्यकता, याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (३) | ५८० | १० | भंडारा जिल्ह्यात साकोली, लाखनी व लाखांदूर पोलिस स्टेशन अंतर्गत ग्रामीण भागामध्ये पोलिस चौकीच्या स्वतंत्र इमारत नसणे, पोलिस अधिकारी व कर्मचारी यांची अनेक पदे रिक्त असणे, त्यामुळे वाढत्या लोकसंख्येनुसार गुन्हेगारीवर प्रतिबंधक कार्यवाही करण्यास अडचण निर्माण होणे, साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात पोलिस कर्मचारी वसाहत नसणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (४) | ५२१ | १०० | तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील मांजरी खुर्द व वाडेबोलाई ही गावे अतिशय गजबजलेली असणे, शहराच्या नजीक असल्याने सदर गावातील लोकसंख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढणे, वाढत्या नागरिकांना बरोबर या ठिकाणी गुन्हेगारीचे प्रमाणही वाढत असणे, त्यामुळे मांजरी खुर्द येथे वाघोली पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस चौकी सुरू करणे बाबत सातत्याने मागणी, तसेच वाडे बोल्हाई हे क वर्ग तीर्थक्षेत्र असून देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीय, सदर ठिकाणी एखादा अनुचित प्रकार घडल्यास लोणीकंद या ठिकाणी दूरवर जावे लागते तसेच सदर गावांमध्ये शाळा व महाविद्यालय असल्यामुळे मुलींची विद्यार्थ्यांचे छेडछाड होण्याच्या घटना घडू नये याकरिता सदर गावामध्ये पोलीस चौकी असणे आवश्यक, मांजरी खुर्द येथे वाघोली पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस चौकी व श्री क्षेत्र वाडे बोल्हाई येथे लोणीकंद पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस चौकी सुरू करणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ५२२ | १०० | लोहगाव हे पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झाल्यामुळे सदर गाव अतिशय झपाट्याने विकसित होणे, बाहेरून येणारे नागरिक लोहगाव व परिसरात स्थायिक होणे यामुळे सदर गावची लोकसंख्या प्रचंड वाढणे, त्यामुळे सदर गावांमध्ये सध्या गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले असणे, त्याचबरोबर चरस, गांजा, दारू विक्री, मुलींची छेडछाड करणे, व्यवसायिकांची लुटमार करणे , गाड्यांची जाळपोळ करणे, मॉर्निंग वॉकला गेलेल्या नागरिकांची लुटमार करण्याच्या घटना सातत्याने घडणे, या वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी लोहगाव येथे नवीन पोलीस स्टेशन सुरू करणे आवश्यक, व सदर पोलीस स्टेशनला वडगाव शिंदे आणि निरगुडी गावचा परिसर जोडणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून वेळोवेळी मागणी करण्यात येणे, लोहगाव येथे नवीन पोलीस स्टेशन सुरू करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अभिजीत पाटील** |
| (६) | ४८९ | १०० | माढा ( जि.सोलापूर ) पोलीस स्टेशन यांच्या मालकीचे असणारे परेड ग्राउंड या ठिकाणी तालुकास्तरीय ध्वजारोहण समारंभ दरवर्षी पार पाडत असतो तसेच त्या ठिकाणी पोलीस व शहरातील नागरिक हे नियमितपणे व्यायाम करतात या ठिकाणी रनिंग ट्रॅक व ओपन जिम पोलीस कल्याण निधीतून उपलब्ध होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची व उपाययोजना. |
| (७) | ४९१ | १०० | माढा ( जि.सोलापूर ) प्रामुख्याने माढा तालुक्यात तीन पोलीस स्टेशन असून माढा पोलीस स्टेशन हे बार्शी उपविभागीय पोलीस अधीक्षक यांच्याशी तर कुर्डूवाडी व टेंभुर्णी पोलीस स्टेशन हे करमाळा उपविभागीय पोलिस अधीक्षक यांच्या अखत्यारीत आहे, माढा तालुक्यातील गुन्हेगारीचे प्रमाण हे दिवसेंदिवस वाढत आहे त्यामुळे सदर उपविभागीय पोलीस अधीक्षक कार्यालय हे तालुक्याच्या ठिकाणी म्हणजे माढा या ठिकाणी होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ४९२ | १०० | टेंभुर्णी ( जि. सोलापूर )शहर हे प्रमुख केंद्रीय मार्गांना जोडण्यासाठी व मराठवाडा भागातील लोकांना मुंबई पुणे या ठिकाणी येण्या जाण्यासाठी केंद्रबिंदू असणे, या पोलीस स्टेशन अंतर्गत ४७ किलोमीटर नॅशनल हायवे येत असणे, या ठिकाणी गुन्हेगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असताना सध्या या ठिकाणी एक पी आय दर्जाचा अधिकारी व ७४ पोलीस कर्मचारी तैनात असणे,वाढत्या गुन्हेगारीचे प्रमाण लक्षात घेता या ठिकाणी दोन पीएसआय दर्जाचे अधिकारी तसेच ३० कर्मचारी यांची नियुक्ती करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ४९३ | १०० | टेंभुर्णी (जि.सोलापूर) पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी कोणत्याही प्रकारचे पोलीस परेड ग्राउंड उपलब्ध नसणे, या ठिकाणी टेंभुर्णी ग्रामपंचायत अंतर्गत जागा उपलब्ध करून त्या ठिकाणी पोलीस परेड ग्राउंड तयार करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ४९५ | १०० | कुर्डूवाडी ( जि. सोलापूर ) पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना व्यायामासाठी कोणत्याही प्रकारची पोलीस परेड ग्राउंड याची सुविधा उपलब्ध नसणे, त्यामुळे गैरसोयीचे होत असणे, त्याकरिता सुविधा व जागा उपलब्ध करुन देण्याबाबत निधीची तरतुद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (११) | ५७० | १० | उमरेड येथील पोलिस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाची व इमारतींची अवस्था अत्यंत गंभीर असणे, बऱ्याच पोलीस खात्याच्या रहिवासी इमारती ह्या जुन्या असून त्यांची देखभाल- दुरुस्ती अनेक दिवसापासून करण्यात आली कारण शासनाने त्यांना नूतनीकरण करणेसाठी आवश्यक निधीची तरतूद केली नसल्याने सदर कामे प्रलंबित असणे, त्यामुळे उमरेड, कुही, भिवापूर, या तालुक्यातील पोलिस खात्यातील अधिकारी,कर्मचारी यांच्या शासकीय वसाहती यांच्या दुरुस्ती साठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ५७१ | १० | उमरेड येथे पोलिस स्टेशन इमारतींची अवस्था अत्यंत गंभीर असणे, बऱ्याच पोलीस खात्याच्या इमारती ह्या जुन्या असून त्यांची देखभाल- दुरुस्ती अनेक दिवसापासून करण्यात आली असणे, शासनाने त्यांना नूतनीकरण करणेसाठी आवश्यक निधीची तरतूद केली नसल्याने सदर कामे प्रलंबित असणे, त्यामुळे उमरेड, कुही,भिवापूर, या तालुक्यातील पोलिस खात्यातील स्टेशन, पोलीस चौक्या, व इतर शासकीय कार्यालये यांच्या दुरुस्ती साठी, निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ५८७ | १० | उमरेड येथील अनेक तरुण, तरुणी मोठ्या प्रमाणात पोलिस भरतीसाठी विशेष प्रयत्न करणे, शारीरिक व बौद्धिक कुशल होण्यासाठी विविध अकादमी मध्ये लाखो रुपये भरून प्रवेश घेत असणे, त्यामुळे शासनाकडे विनंती आहे की नागपूर जिल्ह्यासह राज्यात मोठ्या प्रमाणात पोलिस भरती प्रक्रिया राबवावी व राज्यातील होतकरू तरुण,तरुणी यांना पोलिस खात्यातील नोकरी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (१४) | २८१ | १०० | अंजनगाव सुर्जी ( जि.अमरावती) येथील पोलीस स्टेशन इमारत ही ब्रिटिशकालीन असून सन - १९११ मध्ये या इमारतीचे बांधकाम करण्यात आले होते. त्याचबरोबर पोलिस निवासस्थानाचे बांधकाम ही सन - १९२८ मध्ये करण्यात आले. सद्य:स्थितीत सदर इमारती अतिशय जुन्या व जीर्ण झाल्या असून अनेक ठिकाणी या इमारतीला तडे गेले आहेत. तसेच मुद्देमाल गृहात सतत पडझड होत असल्याने मुद्दे मालाची हानी होत असून इतर अभिलेख ही खराब होत आहेत. तसेच पोलिस स्टेशन व निवासस्थानाची इमारत ही गावाच्या मध्यभागी असून पोलिस स्टेशनकडे येणारे रस्ते हे अरुंद असल्याने कोणतेही मोठे वाहन पोलिस स्टेशन पर्यंत पोहचू शकत नाही. अंजनगाव सुर्जी हे अतीसंवेदशील असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास अरुंद रस्त्यामुळे पोलिस स्टेशन मधून घटनास्थळी जाण्यास पोलिसांचा बराच वेळ खर्ची पडतो व वेळेवर पोहचू न शकल्याने त्यांना आवश्यक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मदत पोहचवता येत नाही. त्यामुळे गावाच्या बाहेरील मुख्य रस्त्यालगत पोलिस स्टेशन व निवासस्थान बांधणे गरजेचे झाले असणे, याकरिता अंजनगाव - परतवाडा रस्त्यावरील अंजनगाव नगरपरिषदेच्या विकास योजनेतील आरक्षण क्र.२२ (पोलिस स्टेशन) कृषी विभागाची खेल हागोने (भू.क्र.५) व खेल हिराजी (भु.क्र.१६) या जागेपैकी सद्या विना वापर असलेली १.२० हे.जमीन नवीन पोलीस स्टेशन व निवासस्थान उभारण्यासाठी अंजनगाव पोलिस स्टेशन कडून प्रस्तावित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१५) | ३५४ | १० | मालवणी, मालाड (पश्चिम) मुंबई येथे मालवणी पोलिस ठाण्याच्या हद्दीत गांजा व एम.डी.ड्रग्जचा साठा असणे, मालवणी परिसरातील शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या परिसरात गांजा व एम.डी. ड्रग्जची बेकायदेशीर विक्री सुरू असणे, शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना या गांजा आणि एम.डी. ड्रग्जचे वाईट परिणाम होत असणे, स्थानिक नागरीक व्यसनाधिन झाले असणे, स्थानिक नागरीकांनी मालवणी पोलिस स्टेशन विरुद्ध मोर्चे काढले असणे, गांजा व एम.डी. ड्रग्जची तस्करी करणाऱ्यावर पोलीसांनी अद्याप कठोर कारवाई केली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | ३५५ | १० | राज्यात एम.डी.ड्रग्ज व ब्राऊन सुगरची तस्करी मोठया प्रमाण वाढली असणे, ड्रग्ज तस्करांचे थैमान माजले असून त्यांच्यावर नियंत्रण राहिले नसणे, ठाणे जिल्हयात नेसेखोरीचा बाजार झाला असणे, ठाणे जिल्हयात २ कोटी २१ लाख ८२ हजार एम.डी.ड्रग्ज पावडर शिळ डायघर पोलीसांनी जप्त केली असणे, शिळ डायघर (जि.ठाणे) पोलीस ठाण्याच्या हद्दीत ड्रग्ज तस्कर मोठया प्रमाणावर वास्तव्य करीत असणे, त्याच प्रमाणे कोल्हापूर शहर व जिल्हयात गांजा व ब्राऊन शुगर तस्करी संघटीत टोळयाव्दारे केली जात असणे, जिल्हयातील कोवळया वयातील लहान शाळकरी मुलांना व्यसनास लावले जात असणे, लहान मुले व्यसनाच्या आहारी जात असणे, जिल्हयात ७७ गुन्हे दाखल झाले असणे परंतू अद्याप गुन्हेगारावर कठोर कार्यवाही केली नसणे, तसचे अद्याप ठाणे व कोल्हापूर जिल्हयातील आरोपींना अद्याप अटक केली नसणे, गुन्हेगारावर संबंधित पोलीस अधिकारी व गुन्हेगारांचे संगनमत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ३५७ | १० | आक्सा बीच ते शितला देवी मंदिर, आक्सा, मार्वे रोड, मालाड (पश्चिम) मुंबई या भागात मोठया प्रमाणावर वेश्या व्यवसाय चालत असणे, वेश्या व्यवसायासाठी दिवस-रात्र रिक्षा चालत असणे, त्यामुळे सामान्य माणसांना रिक्षा मिळत नसणे, शासनाने रिक्षाची व्यवस्था करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, वेश्या धंद्यामुळे स्थानिक रहिवाशांना त्रास होत असणे, महिलांना त्याचा जास्तच त्रास |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सहन करावा लागत असणे, वेश्या व्यवसायामुळे त्या भागात नेहमी भांडणे व हाणामारी होत असणे, सदरचा व्यवसाय बंद करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, मालवणी पोलिस कोणतीही कारवाई करीत नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | ३८२ | १० | अंबोजवाडी - मढ, मार्वे रोड, मालाड (पश्चिम), मुंबई येथे नवीन पोलिस ठाणे करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, या विभागासाठी मालवणी पोलिस ठाणे असणे, मात्र या पोलिस ठाण्यावर ताण पडत असणे, मालवणी पोलिस ठाण्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या वाढत असून सदरचा परिसर झोपडपट्टी युक्त आहे त्यामुळे सदच्या परिसरात शांतता निर्माण होत नसणे, त्यामुळे मालवणी पोलिस ठाण्यावर प्रचंड ताण निर्माण होत असणे, पोलिसांना रात्र दिवस कामावर हजर रहावे लागत असणे, मालवणी पोलिस ठाण्याचा व पोलिसांचा ताण तणाव कमी करण्यासाठी अंबोजवाडी - मढ करिता नवीन पोलिस ठाणे मंजूर करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१९) | ३८४ | १० | मौजे पानगाव तालुका रेनापुर जिल्हा लातूर हे गाव नेहमी अतिसंवेदनशील असणे, या ठिकाणी दंगल होत असणे, विविध लोकांवर विविध कलमांखाली गुन्हा दाखल असणे, सदरचे गाव अति संवेदनशील असल्यामुळे या ठिकाणी नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, मौजे पानगाव येथे नवीन पोलीस ठाणे बांधण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व तातडीच्या उपाययोजना. |
| (२०) | ३८५ | १० | मौजे मस्साजोग, तालुका केज जिल्हा बीड येथे असून सदरच्या गावांमध्ये गुन्ह्यांचे प्रमाण वाढलेले असणे, दंगली होत असणे, परिसरात वाड्या व तांडे असणे, मस्साजोग व वाड्या तांड्यांसाठी नवीन पोलीस ठाण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीच्या उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: बी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५५, मार्ग परिवहन**<br>**रूपये:- २४,६०,००,२१,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२१) | ३६५ | १० | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने ओलेक्ट्रा ग्रीनटेक आणि ईव्ही ट्रान्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांना ५१५०स्टँडर्ड आकाराच्या इलेक्ट्रिक बस खरेदीसाठी आणि त्यानंतर १२ वर्षे संचालन व देखभालीसाठी प्रति किलोमीटर ७८ रुपये दराने एकूण रुपये ७०३७८ कोटींचे काम देण्यात येणे, याबसेस राज्यातील अनेक एसटी बसस्थानकातून सुरू असणे, या इलेक्ट्रिक बसेसवर कंपनीचा चालक असून परिवहन महमंडळाचा वाहक असणे, अनेक इलेक्ट्रिक बसेस तोटयात सुरू असतांना सुध्दा कंपनीला मात्र किमीनुसा ार करोडो रूपयांचे देयके देण्यात येणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | याकारणास्तव परिवहण महामंडळाचे मोठया प्रमाणात नुकसान होत असून परिवहन महांमडळ तोटयात येणे मात्र याचा खापर प्रवाशांच्या माथी मारून तिकिटामध्ये १४ टक्कानी तातडीने वाढ करून इलेक्ट्रिक बसेसमुळे होणारे नुकसान प्रवाशाकडून वसूल करणे, नागपूर महानगर पालिकेने यासारखा करार प्रति किलोमीटर ६२.९ रुपये दराने दिला असणे, तसेच मुंबई महानगरपालिकेच्या बेस्टनेही यासारखा करार प्रति किलोमीटर ६४ रुपये दराने मंजूर केला असणे, या प्रकारच्या करारांचा सरासरी दर सुमारे प्रति किलोमीटर ६५ रुपये असतानाही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने रुपये ७८ दर दिल्याने सुमारे ११,७३० कोटी रुपयांचे नुकसान होणार असल्याने यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्यामुळे प्रवाशात परत असलेले तिव्र असंतोष परिणामी सदर कंपन्यांचा करार रद्द करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: बी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५६, तुरुंग**<br>**रूपये:- ७,७४,७०,४६,०००/-**<br>**श्री. राजु खरे** |
| (२२) | ५८५ | १०० | मोहोळ हे तालुक्याचे ठिकाण आहे सर्वसामान्य जनतेची सुरक्षेची जबाबदारी ज्या प्रशासनावर असते त्या पोलीस प्रशासना ची राहण्याची सोय ही मोहोळ शहरांमध्ये नाही त्यांची एक पोलीस वसाहत मोहोळ शहरात व्हावी अशी पोलीस सेवेतील कर्मचाऱ्यांची मागणी असणे, सदर बाबीत निधीची तरतूद झाली असणे, परंतु प्रत्यक्षात कामास सुरुवात नाही त्यामुळे त्यांची राहण्याची सोय होणे अत्यंत महत्त्वाचे आहे तरी मोहोळ शहरांमध्ये पोलीस वसाहत व्हावी यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (२३) | ५२० | १०० | वडगाव शेरी येरवडा कारागृह असून या ठिकाणी अट्टल कैदी असणे, पुणे शहर हे अतिशय गजबजलेले शहर असणे वाहतूक कोंडी हा ज्वलंत प्रश्न झालेला असून या कारागृहातील व राज्यातील इतर कारागृहातील कैद्यांना न्यायालयात नेण्यासाठी पोलिसांची कसरत होत असणे याकरिता राज्यातील कारागृहात एक स्वतंत्र न्यायालय स्थापन करण्यासाठी हिवाळी अधिवेशन २०२४ मध्ये मागणी केलेली असूनही अद्याप याबाबत कोणतीच कारवाई करण्यात येणे, सबब राज्यातील कैद्यांना तुरुंगातून न्यायालयात ने आण करण्याऐवजी तुरुंगातच कैद्यांसाठी स्वतंत्र न्यायालय स्थापन करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: बी-१०**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५५, पोलीसांवरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- १,२१,३९,३९,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (२४) | ५२४ | १०० | वडगाव शेरी मतदार संघातील पुणे नगर रस्त्यालगत सोमनाथ नगर येथे पोलीस उपायुक्त व पोलीस स्टेशनचे काम गेल्या अनेक वर्षापासून सुरू असणे, सदर काम जवळपास ७० ते ८० टक्के पूर्ण झालेले असणे, परंतु उर्वरित काम अतिशय संथ गतीने सुरु असल्याने पोलीस उपायुक्त कार्यालय सुरू होण्यास विलंब होणे, सबब सदर कार्यालयाचे काम तातडीने पूर्ण करून कार्यालय वापरास सुरु करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२५) | ३४६ | १० | चंद्रपूर शहरासह जिल्ह्यात पोलिस विभागाच्या मार्फतीने सीसीटीव्ही यंत्रणा पुणे व औरंगाबाद येथ्रील खासगी कंपनीकडून लावण्यात आले आहे. या कंपनीला सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे व देखभाल दुरूस्तीचे काम सुध्दा देण्यात आले असतांना सुध्दा या कंपनीकडून लावण्यात आलेले अनेक सीसीटीव्ही यंत्रणा खराब झाले असून काही बंद होण्याच्या मार्गावर आहे. असे असतांना सुध्दा या कंपनीला मात्र पुर्ण बिल मंजूर करून देण्यात आले असल्याची माहिती आहे. जर या कंपनीला सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे व देखभाल दुरूस्तीच्या कामाचे करोडो रूपयांचे बिल अदा करण्यात आले असेल ज्या उददेशासाठी हे सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात आले होते तो उददेशच सफल झालेला नसल्यामुळे शासनाचे करोडो रूपये वाया गेले असल्याने याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२६) | ३४९ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी पोलीस ठाण्यातील कार्यरत असलेल्या पोलिस अधिकारी, पोलिस कर्मचारी यांना चोविस तास काम करावे लागणे, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न बघता या सर्व अधिकारी आणि कम्रचारी यांना पोलिस स्टेशन परिसरातच वसाहतीमध्ये राहणे अत्यंत आवश्यक असणे, याकरिता पोलिस स्टेशन परिसरातच अधिकारी व कर्मचारी यांचे निवासस्थानाचे बांधकाम करणे आवश्यक असणे, ब्रम्हपूरी येथे अधिकारी व कर्मचारी यांच्या करिता किमान ५० निवासस्थानाची आवश्यकता असणे, याकरिता लोकप्रतिनिधीनी पाठपुरावा करून सुध्दा अघापही या प्रस्तावास मंजूरी मिळालेली नसल्यामुळे कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थानापासून वंचित राहावे लागणे, चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी येथील पोलिस स्टेशन येथे कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या करिता निवासस्थानाचे बांधकाम करण्याच्या प्रस्ताव राज्य पोलिस हाऊसिंग महामंडळाकडे प्रलंबित असल्याने या प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मान्यता तिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२७) | ३५० | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही पोलीस ठाण्यातील कार्यरत असलेल्या पोलिस अधिकारी, पोलिस कर्मचारी यांना चोविस तास काम करावे लागणे, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न बघता या सर्व अधिकारी आणि कम्रचारी यांना पोलिस स्टेशन परिसरातच वसाहतीमध्ये राहणे अत्यंत आवश्यक असणे, याकरिता पोलिस स्टेशन परिसरातच अधिकारी व कर्मचारी यांचे निवासस्थानाचे बांधकाम करणे आवश्यक असणे, सिंदेवाही येथे अधिकारी व कर्मचारी यांच्या करिता किमान ५० निवासस्थानाची आवश्यकता असणे, याकरिता लोकप्रतिनिधीनी पाठपुरावा करून सुध्दा अघापही या प्रस्तावास मंजूरी मिळालेली नसल्यामुळे कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थानापासून वंचित राहावे लागणे, चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही येथील पोलिस स्टेशन येथे कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या करिता निवासस्थानाचे बांधकाम करण्याच्या प्रस्ताव राज्य पोलिस हाऊसिंग महामंडळाकडे प्रलंबित असल्याने या प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मान्यता तिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२८) | ३५१ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सावली तालुक्यातील पाथरी पोलीस ठाण्यातील कार्यरत असलेल्या पोलिस अधिकारी, पोलिस कर्मचारी यांना चोविस तास काम करावे लागणे, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न बघता या सर्व अधिकारी आणि कम्रचारी यांना पोलिस स्टेशन परिसरातच वसाहतीमध्ये राहणे अत्यंत आवश्यक असणे, याकरिता पोलिस स्टेशन परिसरातच अधिकारी व कर्मचारी यांचे निवासस्थानाचे बांधकाम करणे आवश्यक असणे, पाथरी येथे अधिकारी व कर्मचारी यांच्या करिता किमान ५० निवासस्थानाची आवश्यकता असणे, याकरिता लोकप्रतिनिधीनी पाठपुरावा करून सुध्दा अघापही या प्रस्तावास मंजूरी मिळालेली नसल्यामुळे कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थानापासून वंचित राहावे लागणे, चंद्रपूर जिल्हयातील सावली तालुक्यातील पाथरी येथील पोलिस स्टेशन येथे कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या करिता निवासस्थानाचे बांधकाम करण्याच्या प्रस्ताव राज्य पोलिस हाऊसिंग महामंडळाकडे प्रलंबित असल्याने या प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: बी-१०**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५५, मार्ग परिवहन यावरील भांडवली खर्च,**<br>**रूपये:- ५,३१,००,०१,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२९) | ३५२ | १० | गडचिरोली आगार विभागातंर्गत येणाऱ्या चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे जुने बसस्थानक असुन प्रवाशांच्या सोईने अत्यंत गैरसोईचे झाले असणे, दिवसेंदिवस प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता प्रवाशांच्या दृष्टीने सर्व सुविधायुक्त बसस्थानकाचे नुतणीकरण करणे अत्यंत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आवश्यक झाले असणे, सिंदेवाही येथील बसस्थानकाचे नुतनीकरण करणे/नवीन बसस्थानक बांधणे याबाबत लोकप्रतिनिधीसह नागरिकांनी मागणी केली असणे, त्याप्रमाणे, सिंदेवाही येथील बसस्थानकाचे नुतनीकरण करणे याबाबतचा परिपुर्ण प्रस्ताव कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, गणेशपेठ नागपूर यांनी प्रस्ताव क्र.राप/काअ/नाग/तां.शा./१२३९ दिंनाक १०/१०/२०२४ रोजी महाव्यवस्थापक बांधकाम महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मध्यवर्ती कार्यालय मुंबई यांच्याकडे निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी पाठविण्यात आले असणे, मात्र गेले पाच महिने होऊन सुध्दा अघापही या प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १८ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) गृह विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई